छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक

बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड

# मराठवाडा दर्शन

मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

Mo.9028349999

MARATHWADA DARSHAN

E-Mail : marathwadadarshannews@gmail.com

संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

प्रतिनिधी पाहिजेत

" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.

:: संपर्क ::

MO.9028349999

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०४ | अंक -६५ | मंगळवार दि.२० ऑक्टोबर २०२६ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ | किंमत ३ रु | पाने ४

Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-04 | Issue 65 | TUESDAY DT.20 OCTOBER 2026 | RNI : MAHMAR/2023/87785 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबरला मतदान

## १८२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात

मुंबई: सध्या महाराष्ट्रामध्ये विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदानाची जोरदार चर्चा सुरू आहे. या निवडणुकीमुळे संपूर्ण राज्याचं राजकारण ढवळून निघालं आहे. ही, महाराष्ट्र विधान परिषदेची अटीतटीची आणि बहुचर्चित औरंगाबाद, पुणे आणि नागपूर विभागातील तीन पदवीधर सोबतच अमरावती आणि पुणे विभागातील दोन शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीसाठीची मतदान प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पार पडणार आहे. पाच मतदार संघामध्ये होणाऱ्या ह्या निवडणूकीमध्ये एकूण १८२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उभे आहेत. या निवडणुकीसाठी पाचही मतदारसंघांत २ हजार ४१९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठीची निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पुणे (शिक्षक आणि पदवीधर), नागपूर, अमरावती आणि औरंगाबाद या पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येत असल्यामुळेभारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ही निवडणूक घेण्यात येत आहे. २३ ऑक्टोबरला निवडणूक झाल्यानंतर मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी केली जाणार आहे. संपूर्ण निवडणूक





प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

पाच जागांसाठी १८२ उमेदवार रिंगणात

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून ४१, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून ४७ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून ३८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. तर, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून २६ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक उमेदवार असून, या पाचही मतदारसंघांत मिळून १८२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदार ठरविणार आहेत.

## टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणात मोठी अपडेट

# कोटा येथून तिन्ही संशयित ताब्यात

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर मुंबईत झालेल्या गोळीबार प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. या प्रकरणातील तीन संशयितांना राजस्थानमधील कोटा येथे ताब्यात घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एजीटीएफ आणि कोटा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ही कारवाई केल्याचे वृत्त आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईत गोळीबाराची घटना घडल्यानंतर तिन्ही संशयित फरार झाले होते. ते मुंबईहून दिल्लीच्या दिशेने जाणाऱ्या एक्स्प्रेस रेल्वेने प्रवास करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे एजीटीएफ आणि कोटा पोलिसांनी संयुक्तपणे सापळा रचला. त्यानंतर कोटा रेल्वे स्थानक परिसरात कारवाई करून तिघांना ताब्यात घेण्यात आले.

दोन संशयित हरियाणातील, एक महाराष्ट्रातील

प्राथमिक माहितीनुसार, ताब्यात घेण्यात आलेल्या तीन संशयितांपैकी दोघे हरियाणातील, तर एक महाराष्ट्रातील रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणात प्रत्येकाची नेमकी भूमिका काय होती, तसेच त्यांना अन्य कोणाची मदत मिळाली होती का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

या गोळीबारामागील कारण, कटात सहभागी असलेल्या इतर व्यक्ती आणि संशयितांना



मिळालेल्या मदतीबाबत तपासातून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. पोलिसांच्या पुढील तपासानंतर या प्रकरणातील अधिक तपशील स्पष्ट होतील.

टायगरवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली प्रतिक्रिया

मुंबई पोलिसांना तपासादरम्यान काही महत्त्वाचे धागेदोरे मिळाले आहेत. तसेच काही संशयितांची ओळख पटल्याची माहितीही त्यांनी दिली. या प्रकरणाचा तपास गांभीर्याने सुरू असून, आरोपींना लवकरच अटक करण्यासाठी पोलीस प्रयत्न करत आहेत. हल्लेखोरांना भित्रे संबोधत फडणवीस म्हणाले की, अंधारातून हल्ले करण्याचे प्रयत्न सहन केले जाणार नाहीत. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.

# प्राचार्य डॉ. दीपक साबळे यांना 'ठाणे गुणिजन पुरस्कार २०२६' प्रदान

## २८ वर्षांच्या शैक्षणिक, लेखन व समाजप्रबोधनातील योगदानाचा गौरव

ठाणे (प्रतिनिधी) : ठाणे महानगरपालिकेच्या ४४ व्या वर्धापनदिनानिमित्त शिक्षणासह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'ठाणे गुणिजन', 'ठाणे गौरव' आणि 'ठाणे भूषण' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यामध्ये शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल प्राचार्य डॉ. दीपक साबळे यांना 'ठाणे गुणिजन पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर, सभागृह नेते हनुमंत जगदाळे यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ. दीपक साबळे हे गेल्या २८ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि मार्गदर्शन देण्याबरोबरच अर्थशास्त्र विषयातील पुस्तके, लेखन आणि व्याख्यानांच्या माध्यमातून त्यांनी ज्ञानप्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.




अर्थशास्त्रासारखा विषय सोप्या, प्रभावी आणि सर्वसामान्यांना समजेल अशा पद्धतीने मांडण्याची त्यांची हातोटी विशेष उल्लेखनीय आहे.

ठाणे येथील नामांकित विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात त्यांनी अर्थशास्त्र विषयाचे ज्येष्ठ प्राध्यापक म्हणून कार्य केले. सन २०२३ पासून ते प्रतिनियुक्तीवर बदलापूर येथील भारत कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा घडवून आणण्यासह प्रशासकीय शिस्त आणि कार्यपद्धती अधिक प्रभावी करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

अर्थशास्त्र विषयातील संशोधन, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीसाठीची तळमळ आणि सामाजिक बांधिलकी या गुणांच्या आधारे अथर्व युनिव्हर्सिटीच्या परीक्षक मंडळाने ७ सप्टेंबर २०२६ रोजी त्यांची राष्ट्रीय स्तरावरील 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' साठी निवड केल्याचेही नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्रभरातून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या निवडक शिक्षकांमध्ये त्यांची निवड झाली असून, ठाणे जिल्ह्यातून या सन्मानासाठी निवड झालेले ते एकमेव शिक्षक असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे.

# आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धेत बलभीम महाविद्यालयाचे घवघवीत यश!

## सुदर्शन घेणे याची दुहेरी रौप्यपदकाची कमाई; निखिल सिंघन यानेही पटकावला द्वितीय क्रमांक

बीड, प्रतिनिधी :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धेत बीड येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, शारीरिक क्षमता आणि जिद्दीच्या जोरावर यश संपादन केले.

या स्पर्धेत महाविद्यालयाचा खेळाडू सुदर्शन बालाजी घेणे याने वेटलिफ्टिंग स्पर्धेतील ६० किलो वजनगटात उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे त्याने शरीरसौष्ठव स्पर्धेतही आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर द्वितीय क्रमांक मिळवून दुहेरी यश संपादन केले.

त्याचप्रमाणे महाविद्यालयाचा दुसरा खेळाडू निखिल नवनाथ सिंघन यानेही शरीरसौष्ठव स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या खेळाडूंनी आपल्या मेहनतीच्या, सातत्यपूर्ण सरावाच्या आणि जिद्दीच्या बळावर मिळवलेल्या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील



लौकिकात भर पडली आहे.खेळाडूंच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे, उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब कोकाटे, डॉ. संतोष डुबल, आयक्यूएसी समन्वयक डॉ. अनिल चिंधे, प्रबंधक पी. पी. डावकर, कार्यालय अधीक्षक किसन सागडे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. जे. जी. तत्तापुरे, डॉ. संतोष घोरपडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.





# पाणीटंचाईवर मात करण्यासाठी धनगरपुरा भागातील हापसा दुरुस्त

बीड : प्रभाग क्रमांक १९ मधील भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन धनगरपुरा भागातील हापसा दुरुस्त करण्यात आला. या वेळी उपस्थित नागरिकांना भविष्यात उद्भवणाऱ्या पाणीटंचाईचे गांभीर्य समजावून सांगत पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

पाणी हे जीवनाचा आधार असून, पाण्याची बचत ही काळाची गरज आहे, असे यावेळी सांगण्यात आले.लोकप्रिय आमदार विजयराजे पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली, नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे व उपनगराध्यक्ष विनोद भैया मुळुक यांच्या सहकार्याने प्रभागातील नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे नगरसेवक मनोज गोडसे यांनी सांगितले.




सोलापूर – स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू , पुद्दुचरी येथील पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांच्या एकता रॅलीचे सोलापूर शहरात मार्केट यार्ड गेटवर मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडकडून पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. रॅलीचे नेतृत्व करणाऱ्या दक्षिण भारतातील पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार पोलीस उपायुक्त व मुस्लिम ब्रिगेड पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आले. यावेळी शहर पोलीस दलातील उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, प्रितम यावलकर, एस.आर.पी. समादेशक दिपाली काळे, सहा. पोलीस आयुक्त मनोजकुमार यादव, अरुण देवकर, प्रताप पोमण, विजय पवार, विजयालक्ष्मी कुर्री, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, अरविंद माने, सुरज मुलाण, बिराजदार सौ. वैष्णवी पाटील यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह मराठा सेवा संघ दक्षिण भारत सचिव राम गायकवाड, छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान, जिल्हाध्यक्ष म शफीक रचभरे, माजी नगरसेवक हारुण शेख आदी उपस्थित होते.

# अमृत जल योजनेतील जलकुंभ व पाणीपुरवठा यंत्रणेची वापरा अभावी गुणवत्ता धोक्यात

बीड प्रतिनिधी : बीड नगरपरिषदेच्या वतीने करावयाचे, अटल अमृत जल योजनेतील काम अपूर्ण राहिलेले आहे. या संदर्भात काही नेते, लोकप्रतिनिधी जरी कोर्टात गेलेले असले तरी, एक गोष्ट सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे वास्तविकपणे ज्यावेळी हे लोक कोर्टात गेलेले आहेत त्या वेळेपर्यंत अटल अमृत जल योजनेतून बांधण्यात आलेले सर्व जलकुंभ व पाणी पुरवठा यंत्रणा ही अतिशय दुरावस्थेला पोहोचलेली आहे. योग्य वेळी या योजनेतून निर्माण केलेल्या सामग्रीच्या वापराची सुरुवात न करण्यात आल्यामुळे तसेच नियमित वापराअभावी ही सर्व यंत्रणा धूळ खात व गंज खात पडलेली आहे. वेळेवर व नियमितपणे वापर न झाल्यामुळे या सर्व जलकुंभ,जलवाहिन्या तसेच पुरवठा यंत्रणा सामग्री यांची गुणवत्ता खराब झालेली आहे. म्हणजेच नजीकच्या भविष्यकाळामध्ये या सर्व यंत्रणेचे डीमोलीशन करणे गरजेचे होऊ शकते. मग अशा परिस्थितीमध्ये आणि इतक्या उशिरा नगरपालिकेच्या विरोधात कोर्टामध्ये जाऊन जरी कोर्टाचा निर्णय आला तरी या सर्व पाणीपुरवठ्याच्या यंत्रणेचा प्रत्यक्षात काहीही उपयोग होणार नाही. मग कोर्टकचेऱ्यांचा बनाव करून खरोखरंच प्रत्यक्षात जनतेच्या घरापर्यंत पाणी येणार आहे का ?? अटल अमृत जल योजना घोटाळ्याची जबाबदारी

## बीड शहर बचाव मंचाच्यावतीने सर्व जल कुंभांची तांत्रिक पाहणी



कोणाची ?

या घोटाळ्यात कोणाकोणाचे हात गुंतलेले आहेत ? शहरातील सर्वच भागांमध्ये नियमितपणे लोकांच्या घरापर्यंत पाणी कधी येणार ? आता पडलेल्या दुष्काळामध्ये पाणीपुरवठा कसा होणार, या वरील उपाययोजना काय आहेत ?

बीड शहरातील आता कार्यान्वित असलेले अनेक जलकुंभ (उदाहरणार्थ, राजीव गांधी चौकातील जलकुंभ ) तांत्रिकदृष्ट्या हे कालबाह्य झालेले आहेत. म्हणजेच तांत्रिकदृष्ट्या यांचा उपयुक्तता कालावधी बऱ्याच काळापूर्वी संपुष्टात आलेला असून यां सर्वच जुन्या झालेल्या जल कुंभांची वापर मुदत फार पूर्वीच संपुष्टात आलेली आहे. आता यांचा जो वापर चालू आहे तो नियम बाह्य , कालबाह्यही आहे. वास्तविक शहराची वाढलेली व्याप्ती व लोकसंख्येचा विस्तार लक्षात घेऊन सर्व जल कुंभांचे पुनर्निर्माण होणे गरजेचे आहे. म्हणजेच शहरांमध्ये नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी फार मोठे आव्हान स्वीकारण्याची आज गरज निर्माण झालेली आहे. या सर्व परिस्थितीवर बीड शहरातील जनतेने जागृत होणे व अतिशय गंभीर होणे गरजेचे आहे.

# नांदेड जिल्ह्यात शिवसेनेचे ९ पैकी ४ आमदार - नांदेडला मंत्रीपद द्या!!

## हेमंत भाऊ पाटील यांना मंत्री करावे - समस्त शिवसैनिकांची एकनाथ शिंदे साहेबांकडे एकमुखी मागणी

माहूर/ प्रतिनिधी

शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ भाई शिंदे साहेब यांच्याकडे नांदेड जिल्ह्यातील समस्त शिवसैनिकांनी एक महत्वाची मागणी केली आहे. नांदेड जिल्ह्यात विधानसभेच्या एकूण ९ जागा आहेत. या ९ पैकी ४ जागांवर शिवसेनेचे आमदार मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत. ही बाब लक्षात घेता नांदेड जिल्हा हा शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे.



इतके आमदार निवडून देऊनही जिल्ह्याला मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने शिवसैनिकांमध्ये नाराजी आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व शिवसैनिक, पदाधिकारी, महिला आघाडी व युवा सेनेच्या वतीने मागणी करण्यात येत आहे की, किनवट-माहूर चे लोकप्रिय नेते मा. आ. हेमंत भाऊ पाटील यांना मंत्रीपद देऊन नांदेड जिल्ह्याला न्याय द्यावा

मा. हेमंत भाऊ पाटील हे नांदेड जिल्ह्यातील सर्वात अनुभवी, अभ्यासू आणि सर्वसमावेशक नेतृत्व आहे. शेतकरी, आदिवासी, बंजारा, ऊसतोड कामगार यांच्या प्रश्नावर ते नेहमीच आक्रमक राहिले आहेत. डइख बँकांच्या उखइखड अटीविरोधात आणि शेतकऱ्यांच्या कृषी पंपाची वीज समश्या सोडविण्या साठी नेहमी प्रयत्न शील,शेतकऱ्यांच्या पीक कर्जासाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. माहूर गड विकास असो वा किनवटच्या आदिवासी भागाचा विकास, त्यांचे योगदान मोठे आहे.

९ पैकी ४ आमदार शिवसेनेचे असताना जर नांदेड जिल्ह्याला मंत्रीपद मिळाले नाही तर तो नांदेडकर जनतेवर अन्याय ठरेल. हेमंत भाऊंना मंत्रीपद दिल्यास नांदेड जिल्ह्यात शिवसेना आणखी मजबूत होईल आणि पक्षाचा विस्तार होईल, अशी भावना शिवसैनिकांनी व्यक्त केली.तरी मा. एकनाथ भाई शिंदे साहेबांनी या मागणीचा गांभीर्याने विचार करून लवकरच होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात हेमंत भाऊंना संधी द्यावी, अशी विनंती या प्रेस नोटद्वारे करण्यात येत आहे.जिल्हा सह संपर्क प्रमुख रवि उत्तमराव राठोड

# प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक!




बीड / प्रतिनिधी

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत बीड जिल्ह्यात नवीन रुग्णालये अंगीकृत करण्याच्या अनुषंगाने आज मा. जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत जिल्ह्यातील आरोग्य सुविधांचा विस्तार करणे, अधिकाधिक रुग्णालयांना योजनेंतर्गत अंगीकृत करून नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, तसेच पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली.नागरिकांना उत्तम आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि आर्थिक अडचणींमुळे कोणालाही उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे.

# दुर्गा महोत्सवात महिलांसाठी दररोज लकी ड्रॉ; साडी भेट देऊन उपनगराध्यक्ष शिवराज पाटील यांचा स्तुत्य उपक्रम



उपविभागिय अधिकारी प्रतिक्षा भुते यांनी दिली भेट

कळमनुरी :श्री वीरशैव दुर्गा महोत्सवाच्या निमित्ताने उपनगराध्यक्ष शिवराज पाटील चौधरी यांनी भाविक महिलांसाठी एक आगळावेगळा आणि आनंददायी उपक्रम सुरू केला आहे. दुर्गा महोत्सवाला दररोज उपस्थित राहणाऱ्या महिलांसाठी लकी ड्रॉच्या माध्यमातून दररोज एका महिलेला साडी भेट देण्यात येत आहे. या उपक्रमामुळे महोत्सवात सहभागी होणाऱ्या महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले विरशैव दुर्गा महोत्सवात सुरु असलेले या कार्यक्रमाला दि १८ रोजी उपविभागिय अधिकारी प्रतिक्षा भुते यांनी भेट दिली धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून महिलांना आनंदाचे काही क्षण अनुभवता यावेत, त्यांचा उत्सवातील सहभाग अधिक उत्साहपूर्ण व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महोत्सव सुरू झाल्यापासून दररोज लकी ड्रॉ काढून एका भाग्यवान महिलेला साडी भेट दिली जात आहे यात १८ अक्टोबर रोजीची शुभांगी विरभद्र अलदुर्गे हे विजेता असुन त्यांना साडी भेट देण्यात आली या वेळी उपविभागिय अधिकारी प्रतिक्षा भुते, नगराध्यक्षा आशलेषा आर आर पाटील, उपनगर शिवराज पाटील, अड वीश्वनाथ चौधरी, राजु पटणे नगर सेवक बबलु पत्की संतोष चौधरी हे उपस्थित होते

याशिवाय, 'होम मिनिस्टर' या लोकप्रिय कार्यक्रमाच्या धर्तीवर महिलांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी महिलांना पैठणी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. धार्मिक वातावरणासोबतच मनोरंजन आणि महिलांच्या आनंदाला प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक होत आहे.श्री वीरशैव दुर्गा महोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरेचे जतन करण्यासोबतच महिलांसाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याने महोत्सवाला सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूप प्राप्त झाले आहे. दररोज साडी भेट देण्याच्या उपक्रमामुळे भाविक महिलांमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले असून, महोत्सवातील उत्साहात भर पडत आहे. विरशैव दुर्गा महोत्सवात उपनगराध्यक्ष शिवराज पाटील व संघर्ष मित्र मंडळांचे हे चांगले उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे

# कळवण ते नाशिक रस्त्यावरील नांदुरी गडावर दुर्दैवी अपघात

## भरधाव सियाज कारच्या धडकेत ड्युटीवर असलेले पोलीस उपनिरीक्षक अधिकारी यांचा उपचारादरम्यान मृत... एपीआयसह अनेक पोलीस कर्मचारी, भाविक जखमी

नाशिक / प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील जागृत असलेले साडेतीन पीठापैकी अर्धपीठ असलेले सप्तश्रुंगी देवी नांदुरी गड येथील बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांवर काळाने घाला घातल्याची अत्यंत दुर्दैवी घटना पहाटे पावनेदोन वाजता घडली आहे. नाशिककडून भरधाव वेगाने येणाऱ्या एका मारुती सियाज कारने अभोणा टी पॉईंटजवळ रस्त्यावर उभ्या असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि भाविकांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात श्रेणी पोलीस उपनिरीक्षक विजय गायकवाड यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, एपीआयसह दोन पोलीस कर्मचारी आणि एक भाविक गंभीर जखमी झाले आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, नांदुरी गड बंदोबस्तासाठी रात्री ०८:०० ते सकाळी ०८:०० वाजेपर्यंतची ड्युटी अभोणा टी पॉईंटवर लावण्यात आली



होती. या ड्युटीवर एपीआय दिनकर मुंडे, ग्रेड पीएसआय विजय गायकवाड, हवालदार सचिन राऊत आणि जिल्हा विशेष शाखा (जि.वा.शा.) चे कर्मचारी तैनात होते.

आज दिनांक १८/११/२०२६ रोजी पहाटे १:४० वाजेच्या सुमारास, नाशिककडून भरधाव वेगाने येणारी मारुती सियाज कार अभोणा टी पॉईंटच्या ५०० मीटर आधी असलेल्या स्पीड ब्रेकरजवळ पोहोचली. या कारने सुरुवातीला एका मोटरसायकल स्वारास उडवले. त्यानंतर अतिवेगामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही कार रॉंग साईडने सुसाट पुढे आली.

तिने समोरून येणाऱ्या दुसऱ्या कारला ड्रायव्हर साईडकडून जोरदार धडक दिली. एवढेच नव्हे तर, रस्त्याच्या मधोमध सुरक्षेसाठी उभे केलेले पोलीस बॅरिकेडस् उडवत थेट ड्युटीवर असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि पायी जाणाऱ्या भाविकांना चिरडत धडक दिली.

या भीषण अपघातात ड्युटीवर असलेले पोलीस अधिकारी आणि भाविक गंभीर जखमी झाले: श्रेणी पोलीस उपनिरीक्षक विजय गायकवाड यांच्या हनुवटीला, दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली आणि पाठीच्या कण्याचा (कमरेचा मणका) फ्रॅक्चर झाला. उपचारादरम्यान ते मयत झाल्याची दुःखद माहिती मिळाली आहे.एपीआय दिनकर मुंडे यांच्या पायाच्या पंजाला दुखापत झाली आहे. हेड कॉन्स्टेबल सचिन राऊत यांच्या डाव्या पायाचा पंजा फ्रॅक्चर झाला आहे.

भाविकांचे नुकसान पायी चालत जाणारे भाविक मोरेश्वर बाळू पाटील (वय ५२, रा. महापे, मुंबई) यांच्या डाव्या पायाचे हाड फ्रॅक्चर झाले आहे. त्यांची पत्नी तेजस्वी आणि सोबत असलेले गोपाळ एकनाथ सोनवणे यांच्या डोक्याला किरकोळ दुखापत झाली आहे.

घटना समजताच वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. आहेर साहेब यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सर्व जखमींना उपचारासाठी तात्काळ वणी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि नंतर पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलवण्यात आले. दुर्दैवाने, उपचारादरम्यान श्रेणी पोलीस उपनिरीक्षक विजय गायकवाड यांची प्राणज्योत मालवली.

पोलीस प्रशासनाकडून घटनास्थळाचा पंचनामा करण्याचे काम सुरू असून, या प्रकरणी सविस्तर फिर्याद नोंदवून पुढील कायदेशीर कारवाई केली जात आहे. कर्तव्य बजावत असताना एका कर्तव्यकठोर पोलीस अधिकाऱ्याचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने पोलीस दल आणि परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# 'जागृती'च्या ज्योतीत निरंकारी संत समागमाच्या तयारीला अंतिम रूप

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून हजारो भाविक होणार सहभागी

फुलंब्री/ प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर जिथे ब्रह्मज्ञानामुळे चेतना जागृत होते, प्रेमामुळे हृदय प्रकाशमान होते आणि सेवा हा जीवनाचा संकल्प बनतो, तिथे संत समागम हा आत्मिक जागृतीचा असा पवित्र उत्सव बनतो, जो मनुष्याला स्वतःच्या अंतरंगात डोकावून पाहण्याची आणि परमात्म्याशी जोडले जाण्याची प्रेरणा देतो.

याच दिव्य भावना आणि आध्यात्मिक चेतनेला साकार करत, सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन छत्रछायेखाली ७९वा वार्षिक निरंकारी संत समागम २३ ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे आयोजित करण्यात येत आहे. देश-विदेशातून हजारो श्रद्धाळू या विशाल संत समागमामध्ये एकत्र येऊन सत्संग, सेवा, प्रेम आणि भक्तीच्या या दिव्य मिलनात सहभागी होणार आहेत.

श्रद्धाळूंच्या वाढत्या सहभागासोबतच समागम स्थळावरील तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. संतांच्या निःस्वार्थ सेवा, अथक परिश्रम आणि समर्पणामुळे साधारण भासणारे हे मैदान आज एका दिव्य आध्यात्मिक नगरीचे स्वरूप धारण करत आहे. विशाल पंडालांमध्ये श्रद्धाळूंसाठी सुव्यवस्थित व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच अत्याधुनिक एल.ई.डी. स्क्रीन बसविण्यात येत आहेत, ज्यामुळे परिसराच्या प्रत्येक कोपऱ्यात बसलेल्या श्रद्धाळूंना प्रेरणादायी प्रवचने, भावपूर्ण भजने आणि आध्यात्मिक विचार सहजपणे पाहता व ऐकता येतील आणि ते सत्संगाच्या आध्यात्मिक प्रवाहाशी एकरूप होऊ शकतील.

हा संत समागम केवळ एक वार्षिक कार्यक्रम नसून ब्रह्मज्ञान, भक्ती, समर्पण आणि आत्मिक जागृतीचा पवित्र संगम आहे. येथे




श्रद्धाळूंना आपल्या अंतःचेतनेला जागृत करण्याची, परमात्म्याशी आत्म्याचे असलेले नाते अनुभवण्याची तसेच विश्वबंधुत्व, सौहार्द आणि निःस्वार्थ सेवा यांसारख्या मानवी मूल्यांना आपल्या जीवनात आत्मसात करण्याची प्रेरणा मिळते. संत समागमाची हीच भावना मनुष्याला बाह्य यश-उपलब्धींच्या पलीकडे जाऊन आपल्या अंतर्मनातील समृद्धी ओळखण्याची संधी प्रदान करते.

समागमाच्या भव्यतेमध्ये श्रद्धाळू भक्तांनी साकारलेले मुख्य स्वागतद्वार विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. आपल्या अनुपम कलात्मकतेसह भव्य स्वरूपामुळे हे प्रवेशद्वार समागमाच्या आध्यात्मिक गरिमेचे दर्शन घडवते. हे केवळ स्वागतासाठी उभारलेले प्रवेशद्वार नसून सेवा, समर्पण, सृजनशीलता आणि सामूहिक श्रद्धेची साकार अभिव्यक्ती आहे. श्रद्धाळूंच्या वाढत्या सहभागासोबतच त्याचे स्वरूपही सातत्याने अधिक विस्तार आणि भव्यता प्राप्त करत आहे. त्याची दिव्य आभा जणू प्रत्येक आगंतुकाचे प्रेम, आपलेपणा आणि समभावाने हार्दिक स्वागत करत असून संत समागमाच्या मानवी संदेशाचे दर्शन घडवत आहे.

संत निरंकारी मंडळाचे सचिव श्री. जोगिंदर सुखीजा जी यांनी माहिती देताना सांगितले की, सतगुरु माताजींच्या दिव्य प्रेरणा आणि आशीर्वादाने समागमाच्या सर्व व्यवस्था सुव्यवस्थितपणे पुढे सुरू आहेत. समागमाचे सुरळीत संचालन, सहज आवागमन आणि श्रद्धाळूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संपूर्ण परिसराचे चार प्रमुख क्षेत्रांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. संतांची कर्मठ आणि निःस्वार्थ सेवा भावना या स्थळाला एका भव्य, सुंदर आणि सुव्यवस्थित आध्यात्मिक नगरीचे स्वरूप प्रदान करत आहे. येथे पोहोचताच श्रद्धाळूंना सेवा, समर्पण आणि आध्यात्मिक वातावरणाची दिव्य अनुभूती होत आहे.

७९वा वार्षिक निरंकारी संत समागम हा प्रेम, भक्ती आणि आत्मिक जागृतीच्या त्या पवित्र प्रवाहाशी जोडले जाण्याची एक अनमोल संधी आहे, जो जीवनाला अंतःकरणातून प्रकाशित होण्याची प्रेरणा देतो. या दिव्य आध्यात्मिक मिलनात सर्व संत महात्मा आणि श्रद्धाळू भक्तांचे मनःपूर्वक स्वागत आहे.




आभा मुंडेची ऐतिहासिक कामगिरी!

# १८ व्या राज्यस्तरीय पॅरा स्विमिंग स्पर्धेत तीन सुवर्णपदकांसह तीन राष्ट्रीय विक्रम

## महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

परळी / प्रतिनिधी

दिव्यांगत्वावर मात करत, अदम्य जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर परळी वैजनाथ तालुक्यातील डाबी गावची सुवर्णकन्या आभा गणेश मुंडे हिने जलतरण क्षेत्रात सुवर्णमयी इतिहास रचला आहे. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या १८ व्या राज्यस्तरीय पॅरा स्विमिंग स्पर्धा २०२६-२७ मध्ये तिने ड८ वर्गात चमकदार कामगिरी करत तीन सुवर्णपदके पटकावली आणि तिन्ही स्पर्धा प्रकारांत राष्ट्रीय विक्रम मोडून नवा कीर्तीमान प्रस्थापित केला आहे. तिच्या या ऐतिहासिक यशाने संपूर्ण महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात आनरपव आणि अभिमानाचे वातावरण पसरले आहे.

पॅरालिम्पिक स्विमिंग असोसिएशन महाराष्ट्राच्या वतीने आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत आभाने आपल्या उत्कृष्ट तंत्राची आणि कौशल्याची चुणूक दाखवली:५० मीटर बॅकस्ट्रोक: आभाने हा प्रकार ४८.३१ सेकंदांत पार करत स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक पटकावले आणि या प्रकारातील राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला.५० मीटर बटरफ्लाय: अत्यंत वेगवान आणि तांत्रिक दृष्ट्या कठीण असलेल्या या प्रकारात तिने ५१.४८ सेकंद वेळ नोंदवत दुसऱ्या सुवर्णपदकासह राष्ट्रीय विक्रमाला गवसणी घातली.२०० मीटर वैयक्तिक मेडले : खेळाडूच्या सहनशक्तीची आणि कौशल्याची कसोटी पाहणाऱ्या या प्रकारात तिने ४ मिनिटे २२ सेकंद वेळ देत तिसरे सुवर्णपद मिळवून स्वतःचाच मागील ५ मिनिट ३ सेकंद चा विक्रम मेडून तिसऱ्या राष्ट्रीय विक्रमावर स्वतःचे नाव कोरले.

जिद्द आणि आत्मविश्वासाचा प्रेरणादायी प्रवास

आभा मुंडे हिचे हे यश केवळ काही पदकांपुरते मर्यादित नसून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ध्येय गाठण्याचे ते एक ज्वलंत उदाहरण आहे. तिचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे: कठोर परिश्रम व सराव: नियमित सराव, तासनतास घेतलेली मेहनत आणि प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे.इतरांसाठी प्रेरणा: तिच्या या यशामुळे क्रीडा विश्वात एक नवा अध्याय लिहिला गेला असून, अनेक नवोदित दिव्यांग खेळाडूंना आभाच्या रूपात पुढे जाण्याची मोठी प्रेरणा मिळाली आहे.

क्रीडा क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव

तीन सुवर्णपदके आणि तीन राष्ट्रीय विक्रमांची ही कामगिरी आभा मुंडे हिच्या क्रीडा प्रवासातील अत्यंत सुवर्णमयी टप्पा ठरली आहे. तिच्या या रुबाबदार यशाबद्दल क्रीडाप्रेमी, जलतरण क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक वर्ग आणि परळीसह राज्यभरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# खुलताबादेत तालुक्यातील राजेराय टाकळी अवैध कत्तलखान्यावर पोलिसांची धडक

खुलताबाद/ प्रतिनिधी

खुलताबाद तालुक्यातील राजेराय टाकळी परिसरात अवैधरीत्या गोवंशांची कत्तल करून मांस विक्री करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या प्रकारावर खुलताबाद पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत चार गोवंशांची कत्तल केलेल्या अवस्थेत आढळून आली असून, सुमारे एक लाख दोन हजार रुपये किमतीचे गोमांस जप्त करण्यात आले. उर्वरित गोवंशांची सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले.

रविवारी (दि. १८ ऑक्टोबर) सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत राजेराय टाकळी येथे अवैधरीत्या गोवंशांची कत्तल सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन व पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

या कारवाईदरम्यान चार गोवंशांची कत्तल झाल्याचे आढळून आले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. थोरात यांनी घटनास्थळी गोमांसाचे नमुने घेऊन पुढील तपासणीसाठी कार्यवाही केली. उर्वरित गोवंशांना राजेराय टाकळी येथील टाकळी-लामणगाव रस्त्यावरील शासकीय जागेत सुरक्षित ठेवण्यात आले. घटनास्थळाचा पंचनामा करून अवैध कत्तलखाना बंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.या प्रकरणी खुलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा क्रमांक ४२६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियमातील संबंधित कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी व सहाय्यक पोलीस अधीक्षक अपराजिता अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रमोद साळवी, पोलीस नाईक आनंद आरसुडे, पोलीस कॉन्स्टेबल अनिल राजपूत, गणेश घुगे व फिरोज पठाण यांनी ही कारवाई केली.या प्रकरणाचा पुढील तपास खुलताबाद पोलीस करीत आहेत.

# गैरव्यवहारांची सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करा - पांडुरंग आवारे-पाटील

**स्व अजित दादा पवार व मुख्यमंत्री यांनी चालु केलेल्या लाडक्या बहिणीचे व पीएम किसान योजनेचे आणि नमो शेतकरी सन्मान योजनचे पैसे बोगस बँक खाते काढून लाखो रू मानेवाडीचे सरपंचाचे पती व रोजगार सेवक यांनी संगनमताने हाडप केले.**

बीड (प्रतिनिधी) दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी मानेवाडी.ता.जि.बीड येथील पांडुरंग आवारे-पाटील व समस्त ग्रामस्थांच्या वतीने खालीलप्रमाणे वस्तुस्थिति आपल्या निदर्शनास आणून देत आहोत

मौजे मानेवाडी येथे सन २०२१ पासून आजतागायत सरपंच सौ. सोनाली प्रदीप माने यांच्या अधिकृत उपस्थितीत रीतसर नोटीस काढून कोणतीही ग्रामसभा झालेली नाही. झालेल्या कथित ग्रामसभा सरपंच यांचे पती प्रदीप अंकुश माने यांच्या उपस्थितीत जवळच्या चार आठ लोकांना सोबत घेऊन गावकऱ्यांना अंधारात ठेवून केवळ कागदोपत्रीच दाखवण्यात आल्या आहेत. तसेच, गावात कोट्यवधी रुपयांची विविध शासकीय विकासकामे केवळ कागदावर बोगस दाखवून अथवा जे काही प्रमाणात कामे झाली आहेत ते अत्यंत निकृष्ट दर्जाची करून शासनाचा लाखों रूपयांचा निधी हडप करण्यात आला आहे. सरपंच सौ. सोनाली प्रदीप माने, त्यांचे पती प्रदीप अंकुश माने, ग्रामसेवक बाळासाहेब तंबरे, रोजगार सेवक युवराज माने यांनी संगनमत करून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला आहे.

गंभीर गैरव्यवहारांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे:

१. समाज कल्याण दलित वस्ती निधीचा अपहार: समाज कल्याण विभागामार्फत मंजूर झालेल्या सुमारे ३० लाख रुपयांच्या निधीतून जुन्याच अस्तित्वात असलेल्या शासकीय डांबरी रस्त्यावर बोगस काम दाखवून शासकीय निधी लाटण्यात आला आहे.

२. मनरेगा (चठएत्र्ड) पांदन रस्ते कामांत गैरव्यवहार व बोगस बँक खाती: सन २०२४ मध्ये मंजूर ५ पांदन रस्ते खडीकरण कामांत मजुरांऐवजी ट्रॅक्टर व जेसीबीचा वापर करून कामे उरकण्यात आली. शिक्षण किंवा रोजगारासाठी मुंबई-पुणे येथे राहणाऱ्या ग्रामस्थांच्या परस्पर 'फिनो बँके'त बनावट खाती उघडून त्यांच्या नावावर लाखो रुपयांचा निधी उचलण्यात आला आहे.

(उदा. मानेवाडी ते मवाईशे वस्ती रस्ता कामाचा निकृष्ट दर्जा उघड करणारे फोटो व व्हिडिओ दि. ११/०७/२०२६ रोजी व्हॉट्सअॅपवर प्रसारित होताच, दि. १२/०७/२०२६ रोजी रातोरात यंत्रांच्या साह्याने थातूरमातूर काम पूर्ण करण्यात आले. अशाच प्रकारे 'दत्तात्रय नवनाथ माने ते रजमीचा ओढा' आणि 'मानेवाडी ते रमेश अंगद माने' या रस्त्यांची कामेही निकृष्ट व बोगस पद्धतीने करण्यात आली आहेत.)

३. प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) लाभार्थी खंडणी: मंजूर १४३ घरकुल लाभार्थ्यांपैकी बहुतांश लाभार्थ्यांकडून प्रत्येकी १९,००० ते ३०,००० आणि एका लाभार्थ्याकडून तब्बल ४९,००० पर्यंत लाच उकळण्यात आली आहे.सरपंच, ग्रामसेवक, रोजगार सेवक, संबंधित इंजिनिअर व बीडीओ यांच्या साटेलोट्यामुळे गरिबांची लूट झाली असून, लाभार्थ्यांचे उर्वरित हप्ते जाणीवपूर्वक रोखण्यात आले आहेत.

४. १५ वा वित्त आयोग निधी गैरव्यवहार: १५ व्या वित्त आयोगांतर्गत गावात झालेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असून केवळ बिले उचलण्याचा उद्देश ठेवून कागदोपत्री दाखवली गेली आहेत.

५. राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय घोटाळा: गावात वाचनालयासाठी सुसज्ज इमारत उपलब्ध असतानाही ते गेल्या अनेक वर्षांपासून कुलूपबंद आहे. वाचनालयाच्या नावावर शासनाकडून मंजूर झालेला लाखो रुपयांचा निधी हडप करण्यात आला आहे.

६. राष्ट्रीय पेयजल योजना अपहार व बेकायदेशीर वसुली: सन २०१३ मध्ये ४४ लाखांची पेजल योजना आणि त्यानंतर वाढीव अंदाजपत्रकात मंजूर ४३ लाख रुपये, अशा सुमारे ८७ लाख रुपयांच्या योजनेत अत्यंत निकृष्ट दर्जाची पाईपलाईन टाकण्यात आली आहे. अध्याप ही त्या योजनेचे पाणी पिण्यास ग्रामस्थांना मिळेत नाही व नळ जोडणीसाठी कनेक्शन दिले म्हणून ग्रामस्थांकडून बेकायदेशीरपणे प्रति कुटुंब १,५०० च्या वर बोगस पावत्या फाडून सक्तीने वसुली करण्यात आली आहे.




७. ग्रामपंचायत भवन जागा गैरव्यवहार: सन २०१८ मध्ये मंजूर झालेले ग्रामपंचायत भवन ग्रामस्थांना विश्वासात न घेता सोयीस्करपणे गावाबाहेर बांधण्यात आले.

८. अपूर्ण अंगणवाडी बांधकाम: सन २०१२ मध्ये मंजूर झालेल्या अंगणवाडी इमारतीचा निधी उचलूनही आजतागायत काम अपूर्ण अवस्थेत पडून आहे.

९. जि. प. प्राथमिक शाळा निकृष्ट बांधकाम: सन २०२०-२१ मध्ये मंजूर झालेले प्राथमिक शाळेचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, ही इमारत कधीही कोसळून लहान मुले व शिक्षकांचा जीव जाण्याची गंभीर भीती निर्माण झाली आहे.

१०)मानेवाडी.ता.जि.बीड येथे गायगोटे ५२ मंजूर असून प्रतेकी १७/१८००० रूपये घेहुन सुद्धा पहीला हाफता सोडता उर्वरित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा नाही केली तरी त्याची ही सखोल चौकशी करून ती रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात जमा करावी हि नम्र विनंती.

११)लाडकी बहीण योजनेचे प्रतेक लाभार्थी महिलेला १५०० रूपये व पी एम किसान योजनेचे २००० हजार रुपये आणि मुख्यमंत्री नमो शेतकरी योजनेचे प्रतेक शेतकरी लाभार्थ्यांना २००० हजार रुपये शासनाचे मिळत असुन असून आनेक लाभार्थ्यांचे फिनो बँकेचे अकाऊंट काढून आनेकांचे पैसे सरपंच व अन्य सहकारी संगनमत करून ते पैसै उचलत आहेत त्या वरील योजनेतील आनेक गौर गरीब लाभार्थ्यांचे बॅंक पासबुक व एटीएम कार्ड हे सरपंचाचे पती प्रदीप अंकुश माने व रोजगार सेवक युवराज मधुकर माने यांच्याकडे आज तागयत त्यांच्या ताब्यात आहेत म्हणून त्याची विषेश बाब म्हणून सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत व सर्व शेतकऱ्यांना व लाडक्या भहीणींना न्याय द्यावा हि नम्र विनंती.

आमची ठळक मागणी:

१. मौजे मानेवाडी येथे वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तत्काळ विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात यावी.

२. उपरोक्त सर्व कामांचे मोजमाप, तांत्रिक ऑडिट आणि आर्थिक फॉरेन्सिक ऑडिट त्रयस्थ गुणवत्ता नियंत्रकाकडून / समितीमार्फत करून दोषींवर भारतीय न्याय संहितेनुसार तत्काळ फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत.

३. घरकुल लाभार्थ्यांचे रोखलेले हप्ते त्वरित जमा करण्यात यावेत.

वरील सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून मानेवाडी ग्रामस्थांना न्याय द्यावा, ही नम्र विनंती मानेवाडी ग्रामस्थ व राष्ट्रवादीकाँग्रेस अजितदादा पवार पक्षाचे, ग्रा प सदस्य पांडुरंग आवारे-पाटील व अन्य ग्रामस्थांनी सह्या करून बीडचे उपजिल्हाधिकारी (ठऊ) मा स्वामी साहेब, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार शेळके साहेब यांना प्रतेक्ष भेटुन निवेदन दिले आहे. आणि वरील सर्व कामांची ३० दिवसांच्या आत सखोल चौकशी करून कारवाई न केल्यास न विलाजाने पांडुरंग आवारे-पाटील यांनी ३० दिवसानंतर आत्मधन करेल असे देखील निवेदनात नमूद केले आहे व ह्याला जबाबदार या वरील विषय संमदीत आपण सर्वजण असाल असा देखील उल्लेख पांडुरंग आवारेंनी केला आहे.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषि मा मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.,मा उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री महोदय, बीड/पुणे.,मा. उपमुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई., मा मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज), जिल्हा परिषद, बीड. यांचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

## पदवीधरांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी डॉ. प्रतापसिंह पाटील यांना संधी द्या – अलीम सय्यद

चकलंबा प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अलीम सय्यद यांनी केले आहे. पदवीधरांचे प्रश्न, बेरोजगार युवकांच्या अडचणी, शिक्षण क्षेत्रातील समस्या आणि सुशिक्षित तरुणांच्या अपेक्षा यांना योग्य व्यासपीठ मिळणे ही काळाची गरज असल्याने डॉ. प्रतापसिंह पाटील यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन विजयी करा असे आवाहन अलीम सय्यद यांनी व्यक्त केले.

आजच्या स्पर्धात्मक युगात उच्च शिक्षण घेऊनही अनेक तरुणांना रोजगारासाठी संघर्ष करावा लागत आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, युवकांना त्यांच्या



पात्रतेनुसार काम मिळणे, तसेच पदवीधरांच्या विविध प्रश्नांवर शासनदरबारी प्रभावीपणे पाठपुरावा होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर पदवीधरांचे प्रश्न समजून घेणारे आणि त्यांच्यासाठी सातत्याने आवाज उठवणारे प्रतिनिधित्व महत्त्वाचे असल्याचे अलीम सय्यद यांनी नमूद केले.

डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांच्याकडे उच्च शिक्षण, आधुनिक विचारसरणी, अभ्यासपूर्ण भूमिका आणि विविध सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांवर ठामपणे भूमिका मांडण्याची क्षमता असल्याचे अलीम सय्यद यांनी सांगितले. या भूमिकेतून त्यांनी डॉ. प्रतापसिंह पाटील यांना पाठिंबा देऊन व पहिल्या पसंतीचे मत देऊन प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अलीम सय्यद यांनी केले आहे.

## पंचवटीतील रामकुंड परीसरात ध्वजस्तंभाचे काम पूर्ण होताच पितळी वस्तूची चोरी

नाशिक / प्रतिनिधी

नाशिक -: सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर रामकुंड परिसरात उभारण्यात आलेल्या ध्वजस्तंभांचे काम पूर्ण होताच धातूच्या वस्तूची चोरी झाल्याचा प्रकार समोर आला आहे. शनिवारी दि. १७ ला सायंकाळी ठेकेदाराकडून दोन्ही ध्वजस्तंभांवर कांस्य धातूच्या वस्तू बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले. मात्र, अवघ्या काही तासांतच चोरीची घटना उघडकीस आल्याने या महत्त्वपूर्ण धार्मिक स्थळावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने कोट्यवधी रुपयांची विकासकामे आणि सुशोभीकरण सुरू असताना नव्याने उभारण्यात आलेल्या धर्मध्वजस्तंभांचे संरक्षण कोण करणार, असा सवाल उपस्थित होत आहे.रामकुंड परिसरात ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या धर्मध्वजारोहण सोहळ्यासाठी ५१ आणि ३१ फूट उंचीचे दोन ध्वजस्तंभ उभारण्यात आले आहेत. या स्तंभांवर धार्मिक प्रतीके आणि आकर्षक नक्षीकाम करण्यात आले आहे. शनिवारी सायंकाळपर्यंत ठेकेदाराचे काम सुरू होते. काम पूर्ण झाल्यानंतर धातूच्या वस्तूंचे नुकसान होऊ नये, यासाठी कामगारांनी स्तंभांच्या चौथऱ्यावरील भाग लाल कापडाने झाकून ठेवला होता. परिसराची स्वच्छता करून कामगार निघून गेल्यानंतर रविवारी दि. १८ रोजी सकाळी या ठिकाणी बसविण्यात आलेली धातूची एक वस्तू चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या परिसरात पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्याचे या घटनेवरून स्पष्ट होत आहे.

काही दिवसांपूर्वी या परिसरात सुरू असलेल्या कामांच्या ठिकाणाहून लोखंडी गज चोरीला गेल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. मद्यपी आणि भुरट्या चोरांकडून हे प्रकार घडत असल्याचे त्यावेळी सांगण्यात आले होते. मात्र, आता चोरट्यांनाकडून थेट ध्वजस्तंभावरील धातूच्या वस्तूंची चोरी होत असेल, तर पोलिसांना यावर कठोर कारवाई करावी लागेल.

या घटनेनंतर नागरिक आणि भाविकांकडून ध्वजस्तंभांच्या ठिकाणी कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी होत आहे. तसेच, ध्वजस्तंभांभोवती मजबूत रेलिंग उभारून अनधिकृत प्रवेश रोखावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे. ध्वजारोहण सोहळ्याला देशभरातून मान्यवर आणि भाविक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेता, प्रशासनाने या घटनेकडे गांभीर्याने पाहून तातडीने सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे आवश्यक असल्याचे नागरिक व भाविक यांनी भावना व्यक्त केल्या

## कॉ.लता गायकवाड यांचा 'एकमत' वृत्तपत्र समूहाच्या वतीने 'नवदुर्गा' म्हणून सन्मान

**महिला, कामगार व वंचितांच्या न्याय्य हक्कांसाठीच्या संघर्षाची दखल**

माहूर/ प्रतिनिधी

पुरोकॉ.लता गायकवाड यांचा 'एकमत' वृत्तपत्र समूहाच्या वतीने 'नवदुर्गा' म्हणून सन्मान महिला, कामगार व वंचितांच्या न्याय्य हक्कांसाठीच्या संघर्षाची दखल माहूरकॉ.लता गायकवाड यांचा 'एकमत' वृत्तपत्र समूहाच्या वतीने 'नवदुर्गा' म्हणून सन्मान महिला, कामगार व वंचितांच्या न्याय्य हक्कांसाठीच्या संघर्षाची दखल

नांदेड : पुरोगामी विचारांचे 'एकमत' वृत्तपत्र समूहाच्या वतीने अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या महाराष्ट्र राज्य सचिव मंडळ सदस्या तथा नांदेड जिल्हाध्यक्ष कॉ.लता गायकवाड यांचा 'नवदुर्गा' म्हणून सन्मान करण्यात आला. शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी तएकमतच्या कार्यालयात त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सामाजिक परिवर्तनासाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या आणि अन्यायग्रस्त महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या कॉ.लता गायकवाड यांच्या कार्याची या सन्मानाच्या माध्यमातून दखल घेण्यात आली.

कॉ.लता गायकवाड या गेल्या अनेक वर्षांपासून महिला चळवळीत सक्रिय असून महिला, कामगार, शेतकरी, विद्यार्थी, युवक आणि समाजातील वंचित व शोषित घटकांच्या




प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करीत आहेत. महिलांना त्यांचे न्याय्य हक्क मिळावेत, त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा, समाजातील अन्यायकारक प्रथा आणि विषमतेविरुद्ध जनजागृती व्हावी, यासाठी त्यांनी विविध आंदोलने व उपक्रमांच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या माध्यमातून त्यांनी महिलांच्या विविध प्रश्नांवर आंदोलने उभारली आहेत. महिलांवरील अन्याय, सामाजिक विषमता, महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण तसेच सामान्य कष्टकरी कुटुंबांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे. नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्तांच्या प्रश्नांवर झालेल्या आंदोलनातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

## ठाण्यातील ज्येष्ठ आंबेडकरी नेते कर्मवीर सुनील खांबे यांचे निधन; सामाजिक चळवळीला मोठा धक्का

ठाणे / प्रतिनिधी

ठाण्यातील ज्येष्ठ आंबेडकरी नेते, बहुजन समाजाच्या हक्कांसाठी लढणारे कर्मवीर सुनील खांबे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. मुंबईतील केईएम रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे ठाणे जिल्ह्यासह महाराष्ट्रातील आंबेडकरी आणि बहुजन सामाजिक चळवळीत शोककळा पसरली आहे.

ठाण्यातील 'आधुनिक भारत परिवार' या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून कर्मवीर सुनील खांबे यांनी काम केले. तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय संघटक आणि बहुजन क्रांती मोर्चाचे सक्रिय नेते म्हणूनही त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार, बहुजन समाजाचे प्रश्न आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी ते सातत्याने आवाज उठवत होते.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान ईव्हीएम मशीनविरोधात त्यांनी ठाण्यात केलेले आंदोलन विशेष चर्चेत आले होते. मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीनवर शाई फेकून त्यांनी आपला निषेध व्यक्त केला होता. त्यांच्या या आंदोलनाची त्यावेळी मोठ्या प्रमाणात चर्चा झाली होती.ठाण्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवांसह विविध सामाजिक आंदोलनांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा.

कर्मवीर सुनील खांबे यांच्या निधनाने बहुजन समाजाच्या प्रश्नांसाठी लढणारा एक परिचित आवाज हरपल्याची भावना सामाजिक आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.त्यांच्यावर २१ ऑक्टोबर रोजी ठाण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या निधनाने ठाणे जिल्ह्याची फार मोठी हानी झाली आहे.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुली, भाऊ,, भवजया, खांबे भावकी असा मोठा परिवार आहे

आंबेडकरी आणि बहुजन चळवळीतील ज्येष्ठ नेते कर्मवीर सुनील खांबे यांचे निधन झाल्याने ठाणे जिल्ह्याची,सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्राची हानी झाली आहे. अनेक सामाजिक आंदोलनांमध्ये कर्मवीर सुनील खांबे यांचा नेहमी



पुढाकार असायचा. समाजातील उपेक्षित वर्गाला सदैव न्याय मिळवून देण्याचा त्यांची भूमिका कायमची स्मरणात राहील,अशी भावपूर्ण आदरांजली मुंबई मराठी साहित्य संघाचे सदस्य बी. डी. गायकवाड यांनी व्यक्त केली.

## महावितरणच्या वीज लपंडावामुळे शेतकरी त्रस्त; आंदोलनाचा इशारा

खुलताबाद/ प्रतिनिधी

घोडेगाव, गोळेगाव, शंकरपूरवाडी व परिसरातील पंचक्रोशीत महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. तीव्र दुष्काळी परिस्थितीत रात्रीच्या वीजपुरवठ्यात वारंवार खंड, कमी दाबाने वीजपुरवठा आणि ट्रिपिंगच्या समस्यांमुळे पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे. परिणामी पिके वाळण्याची भीती असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

महावितरणने या समस्येची तातडीने दखल घेऊन रात्रीचा वीजपुरवठा सुरळीत व अखंडित करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा



सामाजिक कार्यकर्ते ओमदत्त नवनाथ जिते व परिसरातील संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे.

## भक्ती-शक्तीचा संगम असणाऱ्या भगवान गडावरील दसरा मेळाव्यास लाखोंच्या संख्येने बहुजनांनी उपस्थित राहावे!

**अनुसूचित जाती मोर्चाचे बीड तालुकाध्यक्ष पवन कुचेकर यांचे बहुजन बांधवांना आवाहन**

बीड । प्रतिनिधी

बीड : राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पावन जन्मभूमीत, भगवान भक्तीगडावर मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता भक्ती आणि शक्तीचा संगम घडविणारा भव्य दसरा मेळावा पार पडणार आहे. महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकनेत्या ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या मेळाव्याला बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून लाखोंच्या संख्येने बहुजन बांधव, भगवान बाबांचे भक्त, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे जाहीर आवाहन अनुसूचित जाती मोर्चाचे बीड तालुकाध्यक्ष पवन कुचेकर यांनी केले आहे.

भगवान बाबांच्या विचारांचा वारसा जपूया, गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या कार्यातून प्रेरणा घेऊया आणि बहुजन एकतेचा संदेश देण्यासाठी भगवान गडावरील दसरा मेळाव्यात लाखोंच्या संख्येने सहभागी होऊया, असे आवाहन अनुसूचित जाती मोर्चाचे बीड तालुकाध्यक्ष पवन कुचेकर यांनी केले आहे.

# रामेश्वर तांगडे पाटील यांची जनतेचा आवाज... सत्याचा पाठपुरावा...

## युवा प्रदेशाध्यक्षपदी निवड लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्याची महत्वपूर्ण जबाबदारी

दैनिक मराठवाडा दर्शन किसन बी पवार माजलगाव प्रतिनिधी। :

जालना जिल्ह्यातील जांब समर्थ येथील रहिवासी रामेश्वर तांगडे पाटील यांची १६ ऑक्टोबर २०२६, शुक्रवार रोजी लोकशाही पत्रकार संघाच्या युवा प्रदेशाध्यक्षपदी निवड जाहीर झाली. राष्ट्रीय अध्यक्ष बी. बी. वैद्य यांच्या आदेशानुसार राज्य कोअर कमिटीने बैठकीत एकमताने ठराव घेतला आणि निवडपत्र देऊन नियुक्ती जाहीर केली.

संघातील उल्लेखनीय कार्य, सामाजिक कार्य, निष्ठा, मनमिळाऊ स्वभाव, कार्यतत्परता आणि नेतृत्वाचा विचार करुन ही जबाबदारी देण्यात आली. त्यांनी महाराष्ट्रात संघाचा प्रचार केला असून आतापर्यंत सुमारे ५०० पदाधिकाऱ्यांच्या निवडी करुन



संघटनवाढीस हातभार लावल्याचे दिलेल्या माहितीत नमूद आहे.

पत्रकारांच्या विकासात्मक धोरणांसाठीही त्यांनी काम केले. निवडीनंतर मित्रमंडळाकडून सत्कार करण्यात येत असून सोशल मीडियावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या पुढील कार्यांसाठी शुभेच्छा दिल्या. दैनिक मराठवाडा दर्शन सर्व पत्रकार तर्फे हार्दिक हार्दिक शुभेच्छा

# खुलताबाद: तालुक्यात ठिकठिकाणी रस्त्यांची दुरवस्था विभागाचे दुर्लक्ष

खुलताबाद ।प्रतिनिधी

तालुक्यात ठिकठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभाग या विभागांचे रस्ते पुले कामांची दुरावस्था असुण विभागांचे स्पेशल दुर्लक्ष असल्याचे चित्र आहे.खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी ते ताजनापूर फाटा चौफुली,ते २१९ राज्य महामार्ग ताजनापूर फाटा,मोठी शेरोडी,लहान शेरोडी, शेरोडी बुद्रुक ते शेखपूर गाव,ते जैतखेडा मुख्य रस्ता,सोबलगाव धरण कॅनॉल ते झरी फाटा व गाव व पाडळी देरेगाव, हनुमान वाडी, माळेगाव ठोकळ,झरी फाटा ते जैतखेडा रस्ता हद्द,बोडखा फाटा ते चिकलठाणा मोठा नाला हद्द, तांडा ते तीसगाव,तीसगाव ते गल्ले बोरगाव,आजमपूर फाटा ते तांडा धुळे सोलापूर महामार्ग, तीसगाव ते धामणगाव रेल बाजार सावंगी, ते कनकशीळ व कानडगाव फाटा,विरमगाव फाटा ते मोठा नाला, विरमगाव



फाटा ते विरमगा दोन्ही रस्ते,ते घृष्णेश्वर सहकारी साखर कारखाना, टाकळी राजेराय ते लामणगाव फाटा,टाकळी ते काटशेवरी फाटा,ते जटवाडा,सुलतानपूर ते माटरगाव वडोद बाजार सावंगी. राज्य महामार्ग येसगाव नं ३ ते जानेफळ-ममुराबाद तालुकाभर ठिकठिकाणी रस्त्यालगत खड्डेच खड्डे,खडी उखडलेले, पुलाचे मागे पुढे व रस्त्याचे आजुबाजुचे भराव न भरलेले ,अपुर्ण कामे सोडलेले रंगरंगोटी सोडलेले,पुलाचे काही ठिकाणी सुरक्षा म्हणून लोखंडी जाळ्या कठडे सोडलेले, रस्ता अपुर्ण कामे सोडलेले एक ना अनेक रस्ते पुले कामे नादुरुस्त असुण विभाग याची पाहणी सर्वे करायला तयार नाही.व दुरुस्ती कामे करायला तयार नाही.यामुळे तालुक्यातील नागरिक वाहनधारकांना नाहक्क त्रास सहन करावे लागत आहे.वरिष्ठांनी याची दखल घ्यावी किंवा ऑडीट करुन कामे सुरू करावे असी मागणी नागरिकांतून होत

# श्रीराम फायनान्सच्या वतीने अंबाजोगाई, केज,परळी तालुक्यातून १९० गरजू विद्यार्थ्यांना मिळणार शिष्यवृत्तीचा लाभ

अंबाजोगाई प्रतिनिधी उमेश शिंदे

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देऊन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी हातभार लावण्याच्या उद्देशाने श्रीराम फायनान्सच्या वतीने एज्युकेशन स्कॉलरशिप योजना राबविण्यात येत आसुन या योजनेंतर्गत अंबाजोगाई, परळी व केज तालुक्यातील १९० विद्यार्थि पात्र ठरले आहेत. त्यातल्या २७ गरजू विद्यार्थ्यांना शनीवारी आहिल्या नगर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत शिष्यवृत्ती प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे.

श्रीराम फायनान्सच्या स्कॉलरशिप योजना उपक्रमाच्या माध्यमातून आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे येऊ नयेत, तसेच त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, हा उद्देश साध्य होण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक स्वप्नांना बळ देण्यासाठी कंपनीच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

झेडबीएच सचिन ठाकरे,आरबीएच सचिन वडगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा




व्यवस्थाप नवनाथ वाकडे यांच्या प्रयत्नातूनश्रीराम फायनान्स अंबाजोगाई शाखेअंतर्गत अंबाजोगाई, परळी, केज तालुक्यातील १९० गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे.शनिवार १७ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथे अंबाजोगाई, केज व परळी तालुक्यातील २७ विद्यार्थ्यांना जेएमडी सुदर्शन होला,आयपीएस संजय येनपुरे,आयपीएस मुम्मका सुदर्शन,बिझनेस हेड अंकुश अष्टपुत्रे, परिवहन अधिकारी महादेव सूर्यवंशी, शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या हस्ते पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रमाणपत्रे व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले आहे.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाखा व्यवस्थापक नवनाथ वाकडे, सुंदर कुंडगर, संतोष रपकाळ,राहूल जांभळे, प्रविण शिंदे, संतोष वेताळ, शंकर पवार, भागवत इंगळे, श्रीधर यादव, मनोज काळम, मुंजोबा साखरे, संतोष येताळ, संतोष जोगदंड,रुपेश कोकाटे यांनी सहकार्य केले.



**विश्वावंदनीय राजे शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला नाटकाच्या ऑक्टोबर नोव्हेंबर मधील प्रयोगाच्या तारखा पुढील प्रमाणे असतील.**

रामेश्वर तांगडे /उपसंपादक

१) शनि २४ ऑक्टोबर सायं ५.३० वा, बालगंधर्व-पुणे २) शनि २४ ऑक्टोबर सायं रा ९.३० वा, बालगंधर्व-पुणे ३) रवि २५ ऑक्टोबर दु ४.०० छ. शिवाजी मंदिर -दादर. १) शनि १४ नोव्हेंबर सायं रा ७.३० वा, शिवाजी मंदिर -दादर. *हाऊसफुल* २) रवि १५ नोव्हेंबर दु ४.३० वा, आचार्य अत्रे रंगमंदिर-कल्याण. ३) शनि २१ नोव्हेंबर सांय ५:३० वा निळूफुले नाट्यगृह-सांगवी पुणे. ४) रवि २२ नोव्हेंबर रा ८.३० वा विष्णुदास भावे नाट्यगृह-वाशी. ५) शनि २८ नोव्हेंबर सायं ७ वा गोंदिया. ६) रवि २९ नोव्हेंबर सायं ७





# खुलताबाद: जुने बसस्टँड वरील दुकानफोडी दोन संशयित पोलिसांच्या ताब्यात

### न्यायालयाकडून ३ दिवसाची पोलीस कोठडी,तपासात अनेक प्रकरणे उघडण्याची शक्यता

खुलताबाद ।प्रतिनिधी

शहरातील जुन्या बसस्टँड परिसरात दि.४ रोजी मध्यरात्री दोन दुकाना फोडून चोरट्यांनी लाखोचा माल घेऊन पाबोर केला होता त्यातील संशयीत दोन चोरटे पोलिसांच्या ताब्यात आले आहे.आरोपी अकबर लुकमान ३२ जळगाव व दुसरा परवेज महेमुद २२ अहिल्यानगर दोन संशयित तरुण युवक खुलताबाद पोलिसांच्या ताब्यात आले असुण न्यायालयाने आरोपींना ३ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.चोरट्यांनी कापड दुकान व औषधी दुकानांतून मध्यरात्री फोडून अंदाजे दोन लाख रुपयांची रोकड पळवली होती.पोलिसांनी चोरी प्रकरणात त्यांना ताब्यात घेतले आहे व त्यात मा.न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असल्याने कस्टडीत इतर अनेक चोरी प्रकरण उघडण्याची शक्यता आहे.

# ५ हजार रुपयांची मदत नेमकी कोणत्या शेतकऱ्यांना आणि कशी दिली जाणार

नांदेड। संदीप कदम बामणीकर

दुष्काळाची दाहकता दिवसेंदिवस वाढते आहे. महाराष्ट्रातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत सरकारने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची मदत जाहीर करण्याचे आश्वासन दिले आहे. आता ही ५ हजार रुपयांची मदत नेमकी कोणत्या शेतकऱ्यांना किंवा कशी दिली जाणार याबाबत थोडक्यात समजून घेऊयात...

मराठवाड्यासह राज्यातील बहुतांश भागात दुष्काळाची तीव्रता जाणवू लागली आहे. परिणामी सरकारने अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अग्रीम म्हणून ५ हजार रुपये देण्याचे ठरवले आहे. मात्र ही पाच हजार रुपयांची मदत नेमकी कशी वितरित केली जाणार याबाबत शेतकऱ्यांच्या मनात संभ्रम आहे. म्हणजे प्रति शेतकरी मिळणार कि प्रति कुटुंब मदत दिली जाणार, असे प्रश्न उपस्थित होत आहे. शिवाय काही शेतकरी अल्पभूधारक आहेत तर काही शेतकऱ्यांकडे जमीनधारणा अधिक आहे. मग कोणाकडे किती जमीन आहे किंवा किती नुकसान झाले आहे यावरून मदत दिली जाणार का? कृषी विभागाकडून करण्यात आलेल्या पंचनाम्याच्या आधारे मदत दिली जाणार, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. मात्र दुसरीकडे ग्रामपंचायत स्तरावर शेतकऱ्यांकडून फार्मर आयडीसह आधार कार्ड आणि इतर बाबींची पूर्तता केली जात आहे.

कृषी अधिकारी सांगतात, मदत देण्याचा निर्णय झाला आहे, मात्र मदत वितरित कशी केली जाणार, याबाबत माहिती मिळालेली नाही. त्यानुसार मदतीबाबत धोरण ठरवण्याबाबत चर्चा सुरू आहे. शेतकऱ्यांपर्यंत लवकरात लवकर ही मदत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. दिवाळी काही दिवसांवर आली आहे, त्यामुळे शासनाने तातडीने सरसकट शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे पाठवावेत, अशीही मागणी केली जात आहे. तर दुसरीकडे या पाच हजारात दिवाळीचा किराणा देखील होणार नसल्याचे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे*.

## खंदारे गुरुजींची गुरुवचने





**डॉ संगिता पिंगळे**
**बीड**

आनंदासाठी बाहेरच्या झालर ची गरज नाही असे गुरुजी म्हणाले.

आनंदासाठी बाहेरच्या झालर ची गरज नाही असे गुरुजी म्हणाले. आनंद अस्तित्वाशी निगडित आहे. अस्तित्वाच्या स्मरणस्वरूपाच्या संबंधाने आहे. अस्तित्व हे अनादी आहे तसेच आनंद सुद्धा. बाहेर सुख दुःख आहे, सुविधा आहेत पण आनंद आत आहे. गुरुजींचा विचार ,स्मरण मात्र सुद्धा अद्भुत आनंदाचा ठेवा आहे. गुरुजींनी तर स्वतः ला गुप्त ठेवले होते तरी परंतु त्यांच्या अस्तित्वाचा आनंद नित्य दरवळत आहे सर्वांच्या आत. आनंद प्रदर्शित करण्याची गरज नाही तो आपोआप प्रसारीत होतो .गुरुजी आपण साक्षात सच्चिदानंद परमात्म्याचे व्यक्त रूप, आम्ही आपले अंश ,खूप भाग्यवान आहोत, आपल्या अस्तित्वाच्या आनंदाने जीवन फुलले आहे. त्याचा दरवळ कधीच न संपणारा आहे. थँक्स गुरुजी आमच्या निज आनंदाचे अनावरण आपण फार खास हळूवारपणे केले. आपली पद्धतच अद्भुत आहे. आपला नित्य जयजयकार असो.

# भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखा, अंबाजोगाईच्या वतीने जम्बूद्वीप, बुद्ध विहारात साऊंड सिस्टिमचे लोकार्पण

## लोकसहभागातून धम्म चळवळ गतिमान करण्याचा एक उपक्रम

अंबाजोगाई (प्रतिनिधी) उमेश शिंदे

भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखा, अंबाजोगाई यांच्या वतीने लोकसहभागातून धम्म चळवळ गतिमान करण्याचा एक उपक्रम म्हणून लालनगर / क्रांतीनगर, येथील जम्बूद्वीप, बुद्ध विहार, अंबाजोगाई येथे साऊंड सिस्टिमचे लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखा, अंबाजोगाईचे शहराध्यक्ष सुधाकर हातागळे तर, प्रमुख अतिथी म्हणून भारतीय बौद्ध महासभा, बीड जिल्हा (पूर्व) चे जिल्हाध्यक्ष ॲड.बी.बी.धन्वे, जिल्हा संघटक भारत सातपुते हे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारत दासूद यांनी केले. याप्रसंगी स्थानिक रहिवाशांमधून साक्षी घनघाव, अशोक सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर ॲड.बी.बी.धन्वे व भारत सातपुते यांनी आपल्या भाषणातून शुभेच्छा देऊन भारतीय बौद्ध महासभा अंबाजोगाईच्या लोक सहभागातून धम्म चळवळ गतिमान करणे या उपक्रमाचे कौतुक केले. अध्यक्षीय समारोपात बोलताना शहराध्यक्ष सुधाकर हातागळे यांनी भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखा अंबाजोगाईच्या वतीने साऊंड सिस्टिमचे लोकार्पण केले. जम्बुद्धीप, बुद्ध विहारास, दिलेल्या साऊंड सिस्टिममुळे धम्म चळवळ गतिमान होऊन उपासक व उपासिका यांच्या विहाराकडे नियमित येण्यामुळे नवीन संस्कारक्षम पिढी तयार होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. त्यासोबतच या लोकार्पण सोहळ्यासाठी दान पारमिता हा गुण अंगी बाळगून आर्थिक मदत करणाऱ्या सर्व धम्म बांधवांचे ही त्यांनी मनापासून आभार व्यक्त करून त्यांना धन्यवाद दिले. समाजातील या दानशूर व्यक्तींमुळे हा लोकार्पण सोहळा यशस्वी करण्यात आला हेही उपस्थितांना आवर्जून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब खांडके यांनी केले. तर उपस्थितांचे आभार अविनाश घनगाव यांनी मानले, कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा शाखा बीड (पुर्व) चे संजीवनीताई धन्वे, रखमाजी जोगदंड, मयूर धन्वे, तालुका कार्यकारिणीचे प्राचार्य डॉ.विवेक घोबाळे, बालासाहेब हातागळे, सतीश मस्के, तर



भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखा, अंबाजोगाईचे संस्कार सचिव बाळासाहेब खांडके, कार्यालयीन सचिव भारत दासूद, हिशोब तपासनीस दिलीप वैद्य, संरक्षण सचिव निलेश शेवाळे, पर्यटन व प्रचार सचिव अविनाश घनघाव, संघटक शिवाजी सोनवणे, प्रमोद घाडगे यांच्यासह ज्येष्ठ व बाल समता सैनिक तसेच स्थानिक उपासक दत्तु गायकवाड, नारायण सरवदे, सुशील गायकवाड व रविंद्र हातागळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शहर शाखेचे कोषाध्यक्ष बी.जी.चव्हाण, सुजित घाडगे व राजू इंगळे यांनी पुढाकार घेतला. या कृतीयुक्त धम्मकार्याला गती देणाऱ्या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात बौद्ध उपासक-उपासिका तसेच युवक आणि विद्यार्थी वर्गाची लक्षणीय उपस्थिती होती.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** AND PUBLISHED BY **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** ON BEHALF OF **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED ( **MAHARSHTRA** ).
EDITOR- **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB**